महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी नाशिक

द्वारा आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

आदिवासी विकास भवन, पहिला मजला, गडकरी चौक जुना आग्रा रोड नाशिक

दुरध्वनी क्रमांक २५७५६१५, २३१७९३८ फॅक्स क्रमांक २५७९२०८


---

# शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पद भरतीसाठी जाहिरात

केंद्र शासनाच्या प्राप्त होणाऱ्या अनुदानातून महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक या संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यात सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाच्या इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लीक स्कूल पेठरोड, नाशिक / कांबळगांव, जि. ठाणे / चिखलदरा, जि. अमरावती / खैरीपरसोडा, जि. नागपूर येथील चार एकलव्य रेसिडेंशियल पब्लीक स्कूलमध्ये १) पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक - २४ पदे २) प्रशिक्षित पदवीधर शिक्षक - १३ पदे ३) गृहप्रमुख - २ पदे ४) स्टाफ नर्स - २ पदे ५) प्रयोगशाळा सहाय्यक - २ पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

प्रत्येक पदाचे संवर्गनिहाय आरक्षण, समांतर आरक्षण, वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता व अनुभव, पदवी / पदव्युत्तर परिक्षेत प्राप्त गुण, एकत्रित मानधन, परिक्षेचे स्वरुप, निवड पध्द्ती, परीक्षा शुल्क, महत्वाच्या सूचना, अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे, अर्ज पाठविण्यासाठीचा पत्ता, व अर्जाचा नमुना इत्यादी तपशिल या विभागाची वेबसाईट **www.mahatribal.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात आलेला आहे. सदर अर्ज डाऊनलोड करुन संकेतस्थळावरील शर्ती व अटीनुसार अर्ज भरुन आवश्यक त्या कागदपत्राच्या स्वाक्षांकित प्रतीसह जाहिरातीत नमुद केलेल्या पत्त्यावर दिनांक ३०/६/२०१० रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत पोहचेल अशा पध्द्तीने पोस्टामार्फत सादर करावा.

सही /-

**( ज्ञा. स. राजुरकर )**

**सदस्य सचिव**

महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल

सोसायटी नाशिक

# महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी नाशिक
# व्दारा आयुक्तालय आदिवासी विकास
# महाराष्ट्र राज्य, नाशिक

---

केंद्र शासनाच्या प्राप्त होणाऱ्या अनुदानातून महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी नाशिक या संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यात सी.बी.एस.ई.अभ्यासक्रमाच्या इंग्रजी माध्यमाच्या नाशिक, कांबळगांव, चिखलदरा व खैरीपरसोडा येथील ४ एकलव्य रेसिडेन्शियल पब्लीक स्कुलमध्ये रिक्त पदे भरणेसाठी विहित नमून्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे.

| **अ. क्र** | **पदाचे नांव** | **रिक्त पदे** | **अ. जा.** | **अ. ज** | **वि. ज. भ.ज.** | | | | **वि.मा. प्रवर्ग** | **इ.मा. व** | **खुला** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ | ब | क | ड | | | |
| १ | पदव्युत्तर पदविधर प्रशिक्षित शिक्षक | २४ | ०४ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | - | ०१ | ०४ | ११ |
| २ | प्रशिक्षित पदवीधर शिक्षक | १३ | ०३ | ०२ | - | ०१ | ०१ | | ०१ | - | ०५ |
| ३ | गृहप्रमुख | ०२ | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | - |
| ४ | स्टाफ नर्स | ०२ | - | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ५ | प्रयोग शाळा सहाय्यक | ०२ | ०१ | ०१ | - | - | - | - | - | | |

उपरोक्त पदांमध्ये पुढीलप्रमाणे समांतर आरक्षण राहिल.

| अ. क्र. | पदाचे नांव | समांतर आरक्षण पदे | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ.जा. | अ.ज | वि. ज. भ. ज. | | | | वि मा. प्र. | इ.मा.व | खुला |
| | | | | अ | ब | क | ड | | | |
| १ | **पदव्युत्तर पदवीधर शिक्षक** | १ महिला | - | २ महिला | | | | - | १ महिला | १ माजी सैनिक, १ खेळाडू, ३ महिला |
| २ | **प्रशिक्षित पदवीधर शिक्षक** | १ महिला | १ महिला | - | - | - | - | - | - | २ महिला |
| ३ | **स्टाफ नर्स** | - | १ महिला | - | - | - | - | - | - | १ महिला |

**टिप** :- १) भरतीसाठी जाहिर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत व आरक्षणात कमी-जास्त बदल होण्याची शक्यता आहे. २) पदांची संख्या, प्रवर्ग निहाय संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगीत करणे / रद्द करणे / अंशतः बदल करणे याबाबत सर्व अधिकार मा.अध्यक्ष, महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी, नाशिक तथा प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांनी राखुन ठेवले आहेत. ३) माजी सैनिक / खेळाडू / महिला या प्रवर्गातून पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्या-त्या सामाजिक प्रवर्गातून समांतर आरक्षण विरहित म्हणून भरली जातील. ४) सदर भरतीच्या नियम / निकषांमध्ये भरती पूर्ण होई पर्यंत शासन निर्णय / परिपत्रक / पत्र / वरिष्ठांचे आदेशानुसार बदल होवू शकतो.

**वयोमर्यादा**

अ) वरिल सर्व पदांकरिता दिनांक १ जून २०१० रोजी सर्वसाधारण वर्गासाठी ३३ वर्षे व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे वयोमर्यादा राहिल.

ब) प्रकल्पग्रस्त / शारिरिक दृष्टया अपंग उमेदवारांच्या बाबतीत वयाचे ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहिल.

क) संरक्षण दलात ६ महिन्यांपेक्षा अधिक सलग सेवा केलेल्या माजी सैनिकांकरिता संरक्षण दलातील सेवा अधिक तीन वर्षे (कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे पर्यंत शिथिलक्षम)

ड) मात्र सेवेत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहणार नाही.

## १. पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक

| अ. क्र. | विषय | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| | इंग्रजी | २ | एम.ए. ( इंग्रजी ) किमान ५० टक्के गुण, बी.एड. किमान ५० टक्के गुण व मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |
| १ | गणित | ३ | एम.एस्सी (गणित ) किमान ५० टक्के गुण बी.एड. किमान ५० टक्के गुण व मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |
| २ | जीव शास्त्र | ४ | एम.एस्सी (जीवशास्त्र) किमान ५० टक्के गुण, बी.एड. किमान ५० टक्के गुण व मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |
| ३ | भौतिकशास्त्र | ४ | एम.एस्सी (भौतिकशास्त्र) किमान ५० टक्के गुण, बी.एड. किमान ५० टक्के गुण व मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |
| ४ | रसायनशास्त्र | ४ | एम.एस्सी (रसायनशास्त्र) किमान ५० टक्के गुण, बी.एड. किमान ५० टक्के गुण व मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |
| ५ | इतिहास /भूगोल | ३ | एम.ए. ( इंग्रजी माघ्यम इतिहास / भूगोल) किमान ५० टक्के गुण बी.एड. किमान ५० टक्के गुण व मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |
| ६ | मराठी | ४ | एम.ए. (मराठी) किमान ५० टक्के गुण, बी.एड. किमान ५० टक्के गुण आणि मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |

## २) प्रशिक्षित पदवीधर शिक्षक

| अ.क्र. | विषय | पदसंख्या | आवश्यक शैक्षाणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | मराठी | ३ | बी.ए.(मराठी स्पेशल) किमान ५० टक्के गुण, बी.एड. किमान ५० टक्के गुण व मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |
| २ | गणित | ४ | बी.एस्सी (गणित), किमान ५० टक्के गुण, बी.एड. किमान ५० टक्के गुण व मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |
| ३ | भूगोल | २ | बी.ए. (इंग्रजी माघ्यम - भूगोल) किमान ५० टक्के गुण व बी.एड किमान ५० टक्के गुण आणि मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |
| ४ | हिन्दी | ४ | बी.ए. (हिन्दी स्पेशल) किमान ५० टक्के गुण व बी.एड किमान ५० टक्के गुण आणि मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव |

## ३) गृहप्रमुख

कोणत्याही शाखेचा पदविधर (बी.ए. / बी.एस्सी. / बी.कॉम) किमान ५० टक्के गुण, बी.एड. किमान ५० टक्के गुण व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेतील किमान २ वर्षे अध्यापनाचा अनुभव आवश्यक.

## ४) स्टाफ नर्स

इयत्ता १२ वी परिक्षा ५० टक्के गुण मिळवुन उत्तीर्ण व शासनाची अे.एन.एम./जी.एन.एम. पदविका परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवुन उत्तीर्ण असणे आवश्यक.

## ५) प्रयोग शाळा सहाय्यक

इयत्ता १२ वी विज्ञान शाखा किमान ५० टक्के गुण मिळवुन उत्तीर्ण व मान्यताप्राप्त शाळेतील १ वर्षाचा प्रयोगशाळा संबंधीचे कामाचा अनुभव आवश्यक.

६) **एकत्रित मानधन**

१. पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक (दरमहा रुपये २०,०००/- एकत्रित मानधन)
२. प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (दरमहा रुपये १५,०००/- एकत्रित मानधन)
३. गृहप्रमुख (दरमहा रुपये १२,०००/- एकतित्र मानधन)
४. स्टाफ नर्स (दरमहा रुपये १२,०००/- एकत्रित मानधन)
५. प्रयोगशाळा सहाय्यक (दरमहा रुपये ६,०००/- एकत्रित मानधन)

७) **महत्वाच्या सूचना** :- १) अर्जदार भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. २) शासकीय- निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज नियुक्ती प्राधिकारी यांचे परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी. ३) खेळाडू राखीव पदाकरिता अर्जदाराने राष्ट्रीय / राज्य पातळीवरील मान्यताप्राप्त क्रीडा स्पर्धेत वैयक्तीक / सांघीक स्पर्धेत प्रथम, द्वितीय किंवा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त केलेला असावा. तसेच क्रीडा विषयक प्रमाणपत्राच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांबाबत मा. संचालक, क्रीडा व युवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी क्रीडा विषयक प्रमाणपत्र वैध ठरविल्यानंतरच उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येईल. क्रीडा विषयक प्रमाणपत्र अवैध ठरल्यास झालेली निवड आपोआप संपुष्टात येईल / रद्द होईल. ४) अर्जदारांना लेखी / व्यावसायीक परिक्षेस तसेच मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवासभाडे अथवा भत्ता देय राहणार नाही. ५) वरिल सर्व पदांचे पुढील तीन वर्षातील वार्षिक कामकाजाचे तीन वर्षाचे मुल्यमापन करून, एकंदरीत कामकाज समाधानकारक आढळल्यासच त्यांना सेवेत कायम करण्यात येईल. ६) निवड केलेल्या उमेदवाराची बदली / नेमणूक महाराष्ट्रातील कोणत्याही एकलव्य रेसिडेन्शियल पब्लीक स्कुलमध्ये करण्यात येईल. ७) सर्व पदांच्या सेवा हया बदलीपात्र आहेत. ८) निवड समितीचे अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्यावर निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधितास अपात्र ठरविण्यात येईल. ९) उमेदवार शासनाची मान्यताप्राप्त MS-CIT संगणक परिक्षा उत्तीर्ण असावा. १०) सामाजिक आरक्षणाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी जातप्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्रासह क्रीमीलेयर यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहिल. तसेच महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या खुल्या प्रवर्गातील महिलांनी क्रीमीलेयरमध्ये मोडत नसल्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

८) **परीक्षेचे स्वरुप**

पदव्युत्तर पदविधर प्रशिक्षित शिक्षक व प्रशिक्षित पदविधर शिक्षक पदासाठी लेखी व तोंडी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी प्रत्येकी १०० गुणांचे २ पेपर राहतील. पहिला पेपर पदवी परीक्षेला असलेल्या सर्व विषयावर आधारीत दीर्घोत्तरी / वर्णनात्मक राहिल व दुसरा पेपर ज्या विषयासाठी अर्ज केला आहे त्या विषयावर आधारीत दीर्घोत्तरी / वर्णनात्मक राहिल. दोन्ही पेपर एकाच दिवशी घेतले जातील. त्यासंबंधीचे वेळापत्रक लेखी परीक्षेच्या मुलाखत पत्रात कळविण्यात येईल.

गृहप्रमुख, स्टाफ नर्स व प्रयोगशाळा सहाय्यक या पदासाठी २०० गुणांची बहुपर्यायी / वस्तुनिष्ठ स्वरुपात लेखी परीक्षा घेण्यात येईल. उपरोक्त सर्व पदांसाठी लेखी परीक्षेत पात्र ठरणाऱ्या गुणवत्ता धारक उमेदवारांची २५ गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

९) **अर्जासोबत सादर करावयाचे परिक्षाशुल्क**

अर्जा सोबत **रुपये २००/-** चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) **महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी नाशिक या नावाने नाशिक** येथील **स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा जुना आग्रा रोड, नाशिक (क्रमांक ०१४६९)** येथे देय असलेला **राष्ट्रीयकृत बँकेचा** डी.डी. अर्जासोबत जोडावा. तसेच स्वतःचे नाव व पता असलेला रु. ५/- चा पोस्टेज स्टॅप चिकटविलेला २३ X १२ से.मी. आकाराचा लिफाफा सोबत जोडणे आवश्यक आहे.

१०) <u>**अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे**</u>

१) शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे / गुणपत्रके २) जन्म दिनांकासाठी शाळा सोडल्याचा दाखला / शालांत परिक्षा प्रमाणपत्र ३) आरक्षित पदासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र ४) माजी सैनिक / खेळाडू असल्याबाबतचे प्रमाणपत्र ५) अनुभवाचे प्रमाणपत्र ६) परिक्षा शुल्काचा धनाकर्ष ७) पासपोर्ट साईजचा फोटो. ८) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये विवाहित उमेदवाराने त्यांच्या अर्जासोबत अर्जाच्या दिनांकास हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

जाहिरातीसोबत प्रसिध्द केलेल्या नमुन्यातील परिपूर्ण भरलेला अर्ज लिफाप्यात बंद करुन लिफाफयावर ठळक अक्षरात पदाचे नाव टाकुन <u>**मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी नाशिक तथा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक, आदिवासी विकास भवन, जुना मुंबई आग्रा रोड, गडकरी चौक नाशिक** ४२२००२ या पत्यावर **दिनांक ३०/०६/२०१०**</u> पर्यत <u>सायंकाळी ५ वाजेपर्यंत</u> अथवा त्यापूर्वी पोहचतील अशा बेताने पाठविण्यात यावे. कोणत्याही उमेदवाराचे अर्ज या कार्यालयात समक्ष स्विकारले जाणार नाहीत. पोस्टामार्फत प्राप्त झालेले अर्जच स्विकारले जातील. मुदतीनंतर प्राप्त होण-या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची अर्जदारांनी नोंद घ्यावी..

सही /-

**( ज्ञा. स. राजुरकर )**

**सदस्य सचिव,**

महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी
नाशिक तथा आयुक्त,आदिवासी विकास
महाराष्ट्र राज्य नाशिक करिता

# अर्जाचा नमूना

## दिनांक / / या ---------------------- दैनिंकातील जाहिरात

---------------------------------------- - या पदासाठी अर्ज

प्रती,

मा.सदस्य सचिव,
महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक
तथा आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक

| पास पोर्ट आकराचा फोटो राजपत्रीत अधिकाऱ्याने साक्षंकित केलेला येथे चिटकवावा (पीन लावु नय) |
|---|

उमेदवाराने स्वतःचे हस्ताक्षरात अर्ज भरावा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जदारचे नांव | आडनाव | स्वतःचे नाव | वडिलांचे / पतीचे नाव |
| | | | | |
| २ | अर्जदार विवाहित महिला असल्यास विवाहापूर्वीचे नांव | आडनांव | स्वतःचे नांव | वडिलांचे नांव |
| | | | | |
| ३ | पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता (दुरध्वनी क्रमांक सह) | दुरध्वनी क्र. | | |
| ४ | जन्म तारीख अंकी | दिनांक | महिना | वर्ष |
| | | | | |
| ५ | जन्म तारीख अक्षरी | | | |
| ६ | दिनांक १ जून २०१० रोजी पूर्ण वय | वर्ष | महिना | दिवस |
| | | | | |
| ७ | धर्म व जात | | ८ | पुरूष / महिला - |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | अर्जदाराने ज्या प्रवर्गात अर्ज केला आहे त्या प्रवर्गाच्या चौकोनात 'होय' लिहावे. | अ. जाती | अ. जमाती | वि.ज.भ.ज. | | | | विशेष मागास प्रवर्ग | इ.मा.व | खुला |
| | | | | अ. | ब | क | ड | | | |
| | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | अर्जदार उन्नत व प्रगत गटात आहे काय ? होय / नाही | | | | |
| ११ | अर्जदार विवाहित आहे काय? होय / नाही | | असल्यास अपत्यांची संख्या | | |
| १२ | राष्ट्रीयत्व | | | | |
| १३ | महाराष्ट्रातील मुळ रहिवासी आहेत काय? | होय / नाही<br>सक्षम अधिकाऱ्याचे अधिवास प्रमाणपत्र जोडणे आवश्यक | | | |
| १४ | माजी सैनिक / खेळाडू असल्यास (चौकानात 'होय' असे लिहावे ) | पुराव्यासाठी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक | माजी सैनिक | | |
| | | | खेळाडू | | |

## १५. शैक्षणीक अर्हता

| अ. क्र | परिक्षा | मुख्य विषय | दुय्यम विषय | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्के वारी | श्रेणी | उत्तर्णि वर्ष | बोर्ड / विद्यापाठ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी | | | | | | | | |
| २ | एच.एस.सी | | | | | | | | |
| ३ | बी.ए./बी.एस्सी. | | | | | | | | |
| ४ | एम.ए./एम.एस्सी. | | | | | | | | |
| ५ | बी.एड | | | | | | | | |
| ६ | एम.एड./एम.फिल | | | | | | | | |
| ७ | A.N.M. / G.N.M. | | | | | | | | |
| ८ | MS-CIT Exam. | | | | | | | | |

## १६. शैक्षणिक अनुभव/कामाचा तपशिल

| अ.क्र. | संस्थेचे नांव | धारण केलेले पद | अनुभवाचा कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

(**टिप** :- अर्जासोबत प्रमाणपत्र जोडावे. प्रमाणपत्रा शिवाय अनुभवाचा कालावधी ग्राहय धरण्यात येणार नाही.)

## १७. डिमांड ड्राफ्टचा तपशिल

डी. डी. काढणाऱ्या बँकेचे नांव व शाखा :- ---------------------------------------------------------------------------

धनाकर्ष क्रमांक ------------------------------- दिनांक / /२०१० रक्कम रूपये :- --------------------

## १८. सेवा योजन / प्रकल्प कार्यालयाचे नांव :- -------------------------------------------------------------------

**नोंदणी क्रमांक** :- [ ]

## प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो / करते की, मी -------------------------------------- पदासाठी सदर अर्ज करित असुन प्रस्तूत पदाच्या जाहिरातीमधील अटी व शर्ती संबधी सूचना मी काळजी पूर्वक वाचल्या आणि मला समजल्या असून त्या नुसार मी सदरहू पदासाठी पात्र असल्याची खात्री केली आहे. मी अर्जात नमूद केलेली माहिती खरी व बरोबर असून दिलेली माहिती खोटी आढळल्यास मी पूढील कारवाईस पात्र राहीन , तसेच अर्जातील माहिती परिपूर्ण नसल्यास आणि अर्जासोबत आवश्यक प्रमाण पत्राच्या सांक्षांकित प्रती जोडलेल्या नसल्यास माझा अर्ज नाकारण्यात येईल व या बाबत मला काही कळविण्यात येणार नाही याची मला जाणीव असल्याने या बाबत माझा कोणताही आक्षेप राहणार नाही.

दिनांक :- अर्जदाराची स्वाक्षरी

ठिकाण :-

अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडलेल्या आहेत. (अर्जदाराने भरावयाची माहिती.)

| क्र. | |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |

(टिप :- कागदपत्रांची माहिती लिहण्यासाठी जागा अपुरी पडल्यास मागील बाजूस लिहावे.)